DISTRICT AND SESSIONS COURT, JALNA
Survey No - 488, Bypass Road, Jalna 431203
Web-https://jalna.dcourts.gov.in/ Email - mahjaldc@mhstate.nic.in

जिल्हा न्यायालय जालना/संगणक/ निविदा/२०२६ दिनांक :- २८/१०/२०२६

जाहीर निविदा

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथील संगणक विभागासाठी खालील अटी व शर्तींना अधीन राहून **२ केव्हीए (2 KVA) ऑनलाईन युपीएस (UPS) (without battery)** खरेदी करावयाचे आहे.

अ.क्र.	तपशील	संख्या	कंपनीचे नांव	ऑनसाईट वारंटी (वर्ष)	सर्व करांसहित किंमत (रु.)
1	**2 KVA Online UPS** (without battery) Input – 160-300 V, Output – 230 V Frequency - 47 to 53 Hz output sockets – 4 socket with 3 pin	1			

इच्छुक पुरवठाधारकाने वर नमूद तपशिलांसह आपल्या निविदा **"प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना"** यांच्या नावे मोहरबंद लखोट्यात **दिनांक ०४-११-२०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत** (शासकीय सुटीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेत जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथे सादर कराव्यात. सदर निविदा/दरपत्रकाच्या लखोट्यावर **"२ केव्हीए ऑनलाईन युपीएस दरपत्रक"** असा ठळक अक्षरात उल्लेख करावा. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रकांचा निवड प्रक्रियेत विचार केला जाणार नाही.

हे कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रके स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखून ठेवत आहे.

अटी व शर्ती :

१. मोहरबंद/सीलबंद लखोट्यावर **"२ केव्हीए ऑनलाईन युपीएस दरपत्रक"** असा ठळक अक्षरात उल्लेख करून ते जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथे सादर करावे.

२. दरपत्रकातील / निविदेमधील नमूद दर हे **सर्व करांसहित, प्रस्थापित (Installation) व पडताळणीसह (Verification)** नमूद करावेत. तसेच दरपत्रकात युपीएसचा वॉरंटी कालावधी स्पष्ट नमूद करावा.

३. निविदा मंजूर झाल्यानंतर व पुरवठा आदेश (Supply Order) पारित झाल्यानंतर, दरपत्रकात नमूद दराशिवाय कोणताही अतिरिक्त दर किंवा खर्च आकारता येणार नाही.

४. निविदा मंजूर झाल्यानंतर व आदेश निर्गमित केल्यावर युपीएस जिल्हा न्यायालयामध्ये प्रस्थापित (Install) करून पडताळणी झाल्यावरच देयकाची (Bill) अदायगी करण्यात येईल. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास कोणताही विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

५. युपीएस हे नमूद केलेल्या कंपनीचे मूळ (Original) व दर्जेदार असावे. प्रस्थापनेच्या किंवा पडताळणीच्या वेळी त्यात काही दोष आढळल्यास ते तात्काळ बदलून द्यावे लागेल.

६. सदर प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर दरपत्रक रद्द करण्याचा किंवा त्यात बदल करण्याचा अधिकार खरेदी सल्लागार समिती, जिल्हा न्यायालय, जालना यांना राहील.

७. प्रत्येक पुरवठाधारकाने फक्त एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

८. पुरवठा आदेश दिल्यानंतर **७ दिवसांच्या आत** युपीएस जिल्हा न्यायालयाला पुरवणे बंधनकारक राहील.

९. गॅरंटी / वॉरंटी कालावधीत युपीएस निकामी झाल्यास, ते दुरुस्तीसाठी पाठविणे किंवा परत मागवून घेणे याबाबतचा वाहतूक खर्च (Transport Charges) जिल्हा न्यायालय करणार नाही. तो संपूर्ण खर्च संबंधित पुरवठाधारकाला करावा लागेल.

१०. युपीएस गॅरंटी / वॉरंटी कालावधीत तक्रार नोंदविल्यापासून **४८ तासांच्या आत** पुरवठाधारकास युपीएस दुरुस्त किंवा बदलून द्यावे लागेल. त्यासाठी कोणताही अतिरिक्त खर्च आकारता येणार नाही.

११. सदर दरपत्रकातील अटी व शर्ती कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर किंवा संपूर्णतः रद्द करण्याचे अधिकार जिल्हा न्यायालयाने स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

१२. पुरवठा आदेशानुसार वेळेत पुरवठा न केल्यास किंवा अटींचे उल्लंघन केल्यास, कोणत्याही टप्प्यावर कुठलीही पूर्वसूचना न देता पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय, जालना यांना राहील.

१३. दरपत्रकाच्या लिफाफ्यासोबत खालील कागदपत्रे जोडणे अनिवार्य आहे:

- आस्थापना व दुकाने अधिनियम लायसन्स प्रमाणपत्राची प्रत (Shop Act License)
- पॅनकार्डची प्रत (PAN Card)
- जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration)

१४. सदर जाहिरात जिल्हा न्यायालय, जालना यांच्या अधिकृत संकेतस्थळावर https://jalna.dcourts.gov.in प्रसिद्ध करण्यात येईल.

आदेशावरुन

28/10/26

दिनांकः- २८/१०/२०२६

प्रबंधक

जिल्हा न्यायालय जालना.